# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ११/०५/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे जलालखेडा अंतर्गत मौजा भिष्णुर येथे दिनांक १०/०५/२०२४ चे १८.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. निलीमा सिद्धार्थ पाटील, वय ३९ वर्ष, रा. भिष्णुर याचे पतीचे नावावर मौजा भिष्णुर येथील घरामध्ये तिची सासु नामे –सुभद्रा पाटील राहते. फिर्यादीचे नावावर असलेल्या घराला लागून तिचे भासरे आरोपी नामे– गंगाधर नामदेव पाटील त्याची पत्नी तसेच मोठा मुलगा कोमल पाटील व मुलगी असे राहत असुन ते घरा समोरुन जाणाऱ्या रस्त्या वरून फिर्यादी सोबत वाद करत असतात, दिनांक १०/०५/२०२४ रोजी अंदाजे सायंकाळी १८/३० वा. चे सुमारास फिर्यादीचे भासरे आरोपी नामे– १) गंगाधर नामदेव पाटील, वय ६७ वर्ष, २) आरोपी क्र. १) यांची पत्नी महिला आरोपी ३) मुलगा कोमल पाटील, वय २८ वर्ष ४) आरोपी क्र. १) याची मुलगी यांनी घराचे जागेवर संडास बांधण्याचे कारणावरून फिर्यादी व फिर्यादीचे पती व सासु, फिर्यादीची ननद नामे सुजाता वाहने यांना पावड़याने व बासाच्या काठीने मारहाण करून जखमी केले व आरोपीची पत्नी व मुलगी यांनी हातबुक्क्याने मारहाण करुन तुम्हाला मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे जलालखेडा येथे आारेपीतांविरूद्ध कलम ३०७, ३२४, ३२५, ३२३, ५०६, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोउपनि जोशी हे करीत आहे.

# पो.स्टे. खापरखेडा हद्दीत जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १०/०५/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीतील बसुली कॉम्प्लेक्स येथे राजु गेम पार्लर येथे काही इसम विडीयो गेम इलेक्ट्रॉनिक मशिनवर पैसे स्विकारून मनोरंजनाचे नावाखाली मशीनवरील अंकावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्टाफ यांना प्राप्त झाले वरून बसुले कॉम्प्लेक्स येथे राजु विडीओ पार्लर येथे छापा टाकुन **आरोपी नामे— राजू यशवंत बसुले, वय ५५ वर्ष, रा. वार्ड नंबर तीन खापरखेडा २) राजेश नथू शेंडे, वय ५० वर्ष रा. चिंचपूर वार्ड १ सावनेर ३) उमेश रामसेवक धीमार वय ४१ वर्ष रा. वार्ड नंबर ३ खापरखेडा ४) आकाश रामराव पांडेकर, वय ३० वर्ष, वार्ड नं. ५ खापरखेडा** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ५,९००/—रू. ५ इलेक्ट्रिक मशीन प्रत्येकी किंमत २०,०००/— रुपये १,००,०००/— रू. असा एकूण माल १,०५,९००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोउपनि आरती नरोटे, पोहवा प्रफुल राठोड, शैलेश यादव, पोना राजु भोयर, मपोहवा कविता गोंडाणे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर